सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २१३ | शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. प्रमोद पाटील
अमळनेर



सौ. भारती चौधरी
माजी नगराध्यक्षा

## दिनविशेष

२५ एप्रिल

- भारतात दूरदर्शनवर पहिल्यांदा रंगीत प्रसारण सुरू झाले यात रामायण, महाभारत अशा मालिका होत्या.
- सर्वोच्च न्यायालयाने वादग्रस्त अलमट्टी धरणाची उंची ५१९.६ मीटरपर्यंत वाढवण्यास परवानगी दिली.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!

जय स्वदेशी...!!





अमळनेर : राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी बन्सीलाल पॅलेसमध्ये आयोजित अमळनेर विधानसभा क्षेत्रातील बूथप्रमुखांच्या मेळाव्यात बोलताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी जिल्हाध्यक्ष संजय पवार, नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. तिलोत्तमाताई पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटील आदी. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित बूथप्रमुख व कार्यकर्ते. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# अचूक मतदार यादी हाच विजयाचा आत्मा : अनिलदादा

## मतदार पुनरीक्षण प्रक्रियेत विशेष लक्ष देण्याचे बूथप्रमुखांना आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अचूक मतदार यादी असणे हाच आजवरचा आपल्या विजयाचा आत्मा राहिलेला आहे. त्यामुळेच विजयाचा मार्ग सुकर बनल्याचा माझा अनुभव आहे. त्यामुळे बूथप्रमुखांनी मतदार पुनरीक्षण प्रक्रियेत झोकून देत विशेष लक्ष पुरवावे तसेच लोकशाहीच्या या उत्सवात प्रत्येक पात्र नागरिकाला कसा न्याय देता येईल याकडे बूथप्रमुखांनी गंभीरतेने लक्ष पुरवावे, असे आवाहन वजा सूचना माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अमळनेर विधानसभा क्षेत्रासाठी शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता येथील बन्सीलाल पॅलेसमध्ये आयोजित बूथप्रमुख तसेच कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष संजय पवार, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश देसले, तालुकाध्यक्ष भागवत पाटील, माजी नगराध्यक्षा तथा नगरसेविका सौ. जयश्रीताई पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. तिलोत्तमाताई पाटील, महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा सौ. मंदाकिनीताई भामरे, शहराध्यक्ष मुख्तार खाटीक, युवक शहराध्यक्ष पंकज साळी, युवक तालुकाध्यक्ष तारकेश्वर गांगुर्डे, माजी नगरसेवक विनोद पाटील, पत्रकार जितेंद्र ठाकूर आदी होते.

मेळाव्याच्या सुरूवातीला राष्ट्रवादीचे दिवंगत नेते तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अमळनेर विधानसभा क्षेत्रातील नागरिकांच्या वतीने श्रद्धांजली अर्पित करण्यात आली. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन पाटील, भोजमल पाटील, संचालिका सौ. सुषमाताई देसले, नगरसेवक सचिन पाटील, नगरसेवक गोपी कासार, विजय पाटील, राजू फाफोरेकर, नगरसेविका सौ. योगिताताई पाटील, सौ. नंदाताई संदानशीव, राज्य संघटक सुनील शिंपी, युवक जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे,जयेश पाटील, पप्पू कलासे, अरविंद बिऱ्हाडे, माजी नगरसेवक फिरोज पठाण, नरेंद्र चौधरी, एल. टी. पाटील, विश्वास पाटील, शेलकर सर, शिवाजी पाटील, प्रा. सुरेश पाटील, सुनील काटे, इम्रान खाटीक, विक्रांत पाटील, बाजार समितीचे माजी सभापती जितेंद्र पाटील, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा सौ. अलकाताई पवार, सौ. ज्ञानेश्रीताई पाटील आदींसह बूथप्रमुख, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अमळनेर : राष्ट्रवादी काँग्रेसच्या नूतन शहराध्यक्षपदी चेतनसिंग राजपूत यांची मेळाव्यात नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी त्यांचा नियुक्तीपत्र देऊन सत्कार केला. शेजारी आमदार पाटील, सौ. जयश्रीताई पाटील, सौ.तिलोत्तमाताई पाटील आदी.

आमदार पाटील म्हणाले, की आगामी निवडणुका लक्षात घेऊन बूथप्रमुखांसह बीएलओ व बीएलए यांनी सुरू केलेल्या मतदार पुनरीक्षण प्रक्रियेची व्याप्ती समजावून घेणे आवश्यक आहे. या प्रक्रियेत १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक नवीन मतदाराची नोंदणी करण्याला बूथप्रमुखांनी प्राधान्य द्यायला हवे. मतदार यादीतील नावे वगळणे, दुरुस्त्या करणे किंवा पत्त्यातील बदल यांसारख्या तांत्रिक बाबी बूथ स्तरावरच अचूकपणे हाताळाव्यात. जेणेकरून मतदानाच्या दिवशी कोणत्याही प्रकारचा गोंधळ होणार नाही. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून मतदार यादी अद्ययावत ठेवण्यासह ती डिजिटल माध्यमांतून मतदारांपर्यंत कशी पोहोचेल याकडे लक्ष देण्याची जबाबदारीही बूथप्रमुखांचीच आहे. केवळ नावनोंदणी करून थांबायचे नाही, तर प्रत्येक बूथवर मताधिक्य कसे वाढविता येईल, यासाठी 'बूथ प्लस' नियोजनही तितकेच महत्त्वाचे आहे. आपला बूथ जेवढा सक्षम, तेवढा आपला विजय निश्चित हे समीकरण समजावून घ्यावे. याप्रसंगी अंतुर्ली-रंजाणे येथील नवनिर्वाचित सरपंच सचिन बाळू पाटील, चोपडाई येथील देविदास गायकवाड यांचा त्यांनी यथोचित सत्कार केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष विनोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सुनील काटे यांनी आभार मानले.



"बूथ स्तरावर नियोजनाला अतिशय महत्त्व आहे. लोकशाहीची खरी ताकद ही तळागाळातील कार्यकर्त्यांच्या एकजुटीवरच अवलंबून असते, हे नाकारता येणार नाही. आगामी काळात पक्ष संघटनावर अधिक भर देत त्याची प्रक्रिया गतिमान करणे आवश्यक असल्याने बूथप्रमुखांसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. हे काम नेटकेपणाने झाले म्हणजे विजयावर शिक्कामोर्तब होतो.

**- संजय पवार, जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**



"आता जिल्ह्यासह आपल्या मतदारसंघाचे पालकत्व अनिलदादा यांनी स्वीकारले आहे. कार्यकर्त्यांच्या सहीचे पत्र आपण घेऊन मुंबईला जाऊ आणि अनिलदादांना मंत्री बनवू. मात्र, विधानसभा क्षेत्रातील मतदार याद्या पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद गटाप्रमाणे बूथप्रमुखांनी रचना करून नियोजन यशस्वीरित्या पार पाडावे म्हणजे आपला विजय निश्चित असेल आणि अनिलदादांचे मंत्रीपदाचे स्वप्न आपल्याला साकारता येईल.

**-योगेश देसले, जिल्हा कार्याध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**



"लोकशाहीच्या उत्सवात प्रत्येक मताचे मोल अनमोल असते. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमधील अनुभवांतून हे स्पष्ट झाले आहे, की केवळ मतदान करून जबाबदारी संपत नाही, तर ती सुरू होते. आता वेळ आली आहे ती मतदार यादी शुद्धीकरणाची. फॉर्म ७ द्वारे नको असलेली नावे वगळून आणि फॉर्म ८ द्वारे नोंदींमधील त्रुटी दुरुस्त करून लोकशाही अधिक पारदर्शक आणि बळकट करू शकतो. सजग नागरिक म्हणून आपली भूमिका बजवायला हवी. यादीतील चुका सुधारणे आणि समर्थ लोकशाही निर्मितीत अचूक मतदार यादी तयार करण्याची जबाबदारी बूथप्रमुखाचीच आहे.

**-विक्रांत पाटील, माजी नगरसेवक.**



"लोकशाही प्रक्रियेत 'बीएलओ'पासून 'बीएलए'पर्यंतची साखळी हीच विजयाची खरी गुरुकिल्ली आहे. नेत्यांची प्रतिष्ठा ही तळागाळात काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याच्या हातात सुरक्षित असते. अमळनेर विधानसभा क्षेत्रातील ३२९ बूथमधील ८३ शहरी आणि २४६ ग्रामीण विभागांत कार्यरत प्रत्येक कार्यकर्ता म्हणजे खऱ्या अर्थाने 'जमिनीवरचा योद्धा' आहे. आमदार अनिलदादा नेहमीच अभिमानाने म्हणतात, की माझा कार्यकर्ता हा देवदुर्लभ आहे. हे केवळ शब्द नसून एक वास्तव आहे. कारण, जेव्हा उन्हात, पावसात जाऊन हा योद्धा बूथची जबाबदारी सांभाळतो तेव्हा लोकशाहीचा विजय निश्चित असतो.

**-भागवत पाटील, तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

### अमळनेरचा यात्रोत्सव

# प्रशासनातील विविध विभागांकडून सुनियोजनाची ग्वाही

## प. पू. प्रसाद महाराज यांनी बोलावलेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रतिपंढरपूर मानल्या जाणाऱ्या श्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानातर्फे दरवर्षी अतिशय भक्तीमय वातावरणात यात्रोत्सव आयोजित केला जातो. या यात्रोत्सवाला सुमारे २५० वर्षांपेक्षा अधिक वर्षांची परंपरा आहे. यंदाही यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, त्याचा प्रारंभ रविवार, दि. १९ एप्रिल रोजी स्तंभारोपण व ध्वजारोहणाने झाला. त्यानंतर गादीपती प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांनी आज शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी दुपारी ५ वाजता वाडी संस्थानात बोलावलेल्या प्रशासनाबरोबरची बैठक अतिशय सकारात्मक झाली. त्यात प्रशासनांतर्गत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांकडून यंदाच्या यात्रोत्सवाचे सुनियोजन करून तो अतिशय सुरळीतपणे पार पाडला जाईल, अशी ग्वाही प्रसाद महाराजांसह वाडी संस्थानाच्या विश्वस्तांना दिली.



अमळनेर : येथील प्रतिपंढरपूर मानल्या जाणाऱ्या श्री सद्गुरू सखाराम महाराज विठ्ठल-रुक्मिणी वाडी संस्थानातर्फे गादीपती प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांनी शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी संस्थानात बैठक बोलावली होती. यावेळी उपस्थित प्रांताधिकारी भंगाळे, तहसीलदार सुराणा, नायब तहसीलदार कुलकर्णी, पालिकेचे मुख्याधिकारी शिंदे, पोलीस निरीक्षक निकम, सावर्जनिक बांधकाम विभागाचे अक्षय सोनवणे, तालुका आरोग्याधिकारी डॉ. गोसावी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. महाजन, आरोग्य निरीक्षक पाटील, आरोग्य सेवक माकडे, अन्नसुरक्षा अधिकारी (जळगाव) बोऱ्हाडे, निरीक्षक राजपूत, अमळनेर एसटी आगारप्रमुख चौधरी, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता नेमाडे, पालिकेच्या बांधकाम अतिक्रमण विभागाचे अग्रवाल, नगर अभियंता गवांदे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक (चोपडा) मोमीन, वाडी संस्थानाचे विश्वस्त देशमुख आदी.

प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, नायब तहसीलदार अजय कुलकर्णी, पालिकेचे मुख्याधिकारी गणेश शिंदे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, सावर्जनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता अक्षय सोनवणे, तालुका आरोग्याधिकारी डॉ. गिरीश गोसावी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास महाजन, आरोग्य निरीक्षक ए. एच. पाटील, आरोग्य सेवक यू. एन. माकडे, अन्नसुरक्षा अधिकारी (जळगाव) आकाश बोऱ्हाडे, निरीक्षक कुमारसिंग राजपूत, अमळनेर एसटी आगारप्रमुख पी. बी. चौधरी, महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता टी. एच. नेमाडे, पालिकेच्या बांधकाम अतिक्रमण विभागाचे राधेश्याम अग्रवाल, नगर अभियंता सचिन गवांदे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक (चोपडा) कय्युम मोमीन, वाडी संस्थानाचे विश्वस्त रवींद्र देशमुख, रविकांत देशमुख आदी बैठकीस उपस्थित होते.

बैठकीच्या सुरूवातीस प. पू. संतश्री प्रसाद महाराज यांच्याकडून यात्रोत्सव कालावधीत भाविकांसाठी बोरी नदीपात्र स्वच्छ व सुंदर असावे. पोलीस

पान २ वर

# काढणीसाठीचा मका शॉर्टसर्किटने खाक

## पारोळा रोडवरील घटना; पालिकेचा बंब पोहोचण्यापूर्वीच आग आटोक्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पारोळा रोडवरील वरद जीनिंगच्या मागील बाजूस असलेल्या शेत शिवारातील शेतांमध्ये काढणीसाठी पडून असलेला मका तसेच ठिबकच्या नळ्या शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता शॉर्टसर्किटमुळे आग लागून खाक झाले. यात संबंधित शेतकऱ्यांचे जवळपास साडेसहा लाखांचे नुकसान झाले आहे. यासंदर्भात संबंधित शेतकऱ्यांकडून महावितरणसह तलाठी व प्रांताधिकाऱ्यांना यासंदर्भात माहिती दिल्याचे सांगण्यात आले.

### पालिकेचा बंब वेळेत पोहोचलाच नाही

या घटनेची पालिकेच्या अग्नीशमन विभागास नगरसेवक विजय कहारू पाटील यांनी तत्काळ माहिती दिली. त्यानंतर अग्नीशमन बंब घटनास्थळाकडे रवानाही झाला. मात्र, हा शेत शिवाराचा परिसर नाल्याच्या पुढे आहे. त्यात नाल्यानजीकच्या रस्त्याची अतिशय दुरवस्था झालेली असल्याने बंब घटनास्थळी पोहोचण्यास उशीर झाला. तोपर्यंत संपूर्ण मका व ठिबकच्या नळ्या खाक झाल्याचे संबंधित शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले. जर बंब वेळेत पोहोचला असता, तर काहीतरी हाती लागले असते. गेल्या काही दिवसांपूर्वी या नाल्याकाठच्या रस्त्याच्या दुरुस्तीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. मात्र त्यांच्याकडून अद्याप याची दखल घेण्यात आलेली नाही.

या घटनेची माहिती अशी, की येथील पारोळा रोडवरील वरद जीनिंगच्या मागील बाजूस

पान २ वर



अमळनेर : येथील पारोळा रोडवरील वरद जीनिंगच्या मागील बाजूस असलेल्या शेत शिवारातील शेतांमध्ये काढणीसाठी पडून असलेला मका तसेच ठिबकच्या नळ्या शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता शॉर्टसर्किटमुळे आग लागून खाक झाले.

## संपादकीय

# व्यसने आणि गरिबीचे चक्रव्यूह

कोणतेही व्यसन हे प्रकृती आणि पैसा या दोघांसाठीही घातकच असते. मग ते व्यसन दारू, सिगारेट, तंबाखूचे असेल किंवा अलीकडच्या तंत्रज्ञान युगात तासन्‌तास मोबाईलवर चॅटिंग करण्याचे असो. मोबाईलवरचे गेम खेळण्याचे व्यसन असो. अलीकडे तर रील बनविण्याचे एक नवे व्यसन युवा पिढीला जडलेले आहे. अशी एक ना अनेक प्रकारची जेवढी काही व्यसने आहेत ती काही काळापुरती दिलासा देणारी किंवा सुखकारक वाटतात. परंतु एकजात सगळ्या व्यसनांचे दीर्घकालीन दुष्परिणाम अत्यंत घातक ठरत असतात. एखाद्या गोष्टीमध्ये गुंतून पडणे, अडकून पडणे त्याला व्यसन म्हटले जाते. किंबहुना अंतिमतः ज्याचे परिणाम विघातकच ठरतात म्हणून त्याला व्यसन हाच शब्द वापरला जातो. कोणतीही चांगली गोष्ट जेव्हा वारंवार केली जाते. तेव्हा त्याला सवय किंवा संस्कार म्हटले जाते. परंतु अनिष्ट किंवा अयोग्य गोष्टींच्या नादी लागून आपला वेळ, पैसा, वाया घालवला जातो. त्याला व्यसन म्हणण्याशिवाय दुसरा शब्द सापडत नाही. भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात वेगवेगळ्या प्रकारची व्यसने असणाऱ्यांची संख्या जवळपास चाळीस कोटी आहे. त्यामध्ये अलीकडच्या काळातील मोबाईल गेम किंवा रील्स चॅटिंग यासारख्या व्यसनांचा समावेश नाही. केवळ सिगारेट, तंबाखू, विडी, गुटखा यासारखे व्यसन असणाऱ्यांची भारतातील संख्या तब्बल २६ कोटी सात लाख आहे. इतक्या प्रचंड प्रमाणावर व्यसनाधीन असणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थितीदेखील जेमतेम स्वरूपाचीच असते. विशेषतः मोलमजुरी किंवा रोजंदारीवर काम करणारे हे तंबाखू आणि विडीचे सर्वाधिक शौकिन असल्याचे पाहायला मिळते. सिगारेट पिणाऱ्यांचा वर्ग आर्थिकदृष्ट्या थोडा वरचा जरी असला तरी त्यांचा या व्यसनावर होणारा खर्च निव्वळ अनाठायी ठरतो. अलीकडेच भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, राष्ट्रीय कर्करोग प्रतिबंध आणि संशोधन केंद्र तसेच टाटा समाज विज्ञान संस्था यांनी एकत्रितपणे देशभरात काही ठिकाणी सर्वेक्षण आणि संशोधन करून जो निष्कर्ष काढला आहे तो नावीन्यपूर्ण आणि व्यसनाचे आर्थिक दुष्परिणाम सांगणाराही ठरला आहे.

या अहवालातून समोर आलेली माहिती सरकार आणि समाजालासुद्धा गंभीरपणे विचार करायला लावणारी ठरते. १४० कोटीपैकी सव्वीस कोटी लोक तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थाचे व्यसनी आहेत. याशिवाय सिगारेट, गुटखा किंवा अगदी मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्यांची संख्यादेखील बरीच मोठी आहे. १४० कोटी संख्येपैकी २६ ते ४० कोटी लोक वेगवेगळ्या व्यसनावर जो खर्च करतात. तो त्यांचा व्यक्तिगत खिसा रिकामा करणारा तर ठरतोच. परंतु त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणामही करणारा ठरतो. या अहवालाने असा निष्कर्ष काढला आहे, की या २६ कोटी लोकांनी जर आपली तंबाखूची व्यसने जर सोडली तर त्यातले जवळपास दोन कोटी कुटुंब हे दारिद्र्यमुक्त होऊ शकतात. म्हणजे गरिबीच्या दूर्दशेतून ते बाहेर पडू शकतात. साधारणपणे या व्यसनाधिन कुटुंबाचा तंबाखू आणि तत्सम व्यसनांवर तब्बल ६.४ टक्के खर्च होत असतो. जर त्यांनी ही व्यसने सोडली तर त्यांचा हा पैसा वाचू शकतो. त्यांची गरिबी नाहीशी होऊ शकते. व्यसनावरचा हा खर्च ते आपल्या रोजच्या आहारामध्ये अधिक पोषक अन्नधान्य घेऊन प्रकृती चांगली ठेवू शकतात. एवढेच नव्हे तर व्यसनावरचा हा खर्च ते शिक्षण आणि इतर चांगल्या कामांसाठीसुद्धा वापरू शकतात. शिवाय हे व्यसन सुरू असतानाच अनेकांना वेगवेगळे आजार जडतात. त्याच्या उपचारावर होणारा खर्च त्या कुटुंबाला आणखीच गरिबीच्या खाईत ढकलणारा ठरतो. कारण घरातला कर्ता सवरता पुरुष किंवा महिला आजारी किंवा व्याधीग्रस्त झाल्यानंतर कुटुंबातील कमावणारी व्यक्तीच हतबल ठरते आणि सगळे कुटुंब दारिद्र्याच्या चक्रव्यूहातच फिरत राहते. आतापर्यंत जागतिक आरोग्य संघटनेपासून ते भारतातील अनेक वैद्यकीय संस्थांनी व्यसनांचे शरीरावर होणारे परिणाम वारंवार सांगितलेले आहेत. व्यसने आणि आजार हे सांगण्यावरच अधिकाधिक भर दिला जात होता. परंतु आता देशातील या प्रमुख संस्थांनी व्यसनाच्या दुष्परिणामांबरोबरच गरिबी दूर करणारा उपाय पहिल्यांदाच सांगितला आहे.

साध्या तंबाखू आणि त्याच्याशी संबंधित व्यसनातून जर दोन-तीन कोटी लोक गरिबी मुक्त होणार असतील तर अन्य दारू, जुगार, मादक पदार्थांच्या व्यसनांपासून लोक दूर राहिले तर गरिबीतून बाहेर पडणाऱ्यांची संख्या आणखी वाढू शकते. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. ती अधिक चांगली होऊ शकते. किंबहुना व्यसनांवरचा हा पैसा आरोग्याची काळजी घेण्यासाठी किंवा आणखी काही चांगले उपक्रम सुरू करण्यासाठी वापरता येऊ शकतो. आज तर आर्थिकदृष्ट्या गब्बर असलेले लोकही मौजमस्ती म्हणून व्यसने करतात. अनेक कॉर्पोरेट ऑफिसेसच्या बाहेर सिगारेट पिणाऱ्या मुलींची संख्या मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. कुठल्याही गोष्टीचा शौक आणि त्यातून व्यसन लागावे याचेदेखील भान राहत नाही. अशा केवळ व्यसनावर पैशाची उधळपट्टी करणाऱ्यांनी जर हा पैसा चांगल्या

कामांसाठी वापरला तरी त्यातून एकूणच समाजाचे आर्थिक आरोग्य निश्चितपणे सुधारू शकते. सगळ्या प्रकारची व्यसने आणि आर्थिक आरोग्याला घातक आहेत. हेच या अहवालातून स्पष्टपणे सांगितले गेले आहे. या पद्धतीने समाजातल्या विविध समस्यांचे सकारात्मक संशोधन आणि निष्कर्ष समाजासमोर आणले गेले तर त्याचे महत्त्व लवकर लक्षात येऊ शकेल. व्यसने ही शरीर प्रकृतीला त्रासदायक असतातच आणि पैसा वाया घालवणारीच असतात. हे समजत असूनही उमजत नाही. परंतु व्यसने गरिबी दूर करू शकतात हे वेगळ्या पद्धतीने सांगितले जाणे तितकेच गरजेचे आहे.

### करणखेड्यात धक्कादायक प्रकार :

## घरात घुसून तरुणीचा विनयभंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील करणखेडा येथे घरात एकटी असलेल्या १८ वर्षीय तरुणीच्या घरात जबरदस्तीने घुसून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २० रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. पीडित तरुणी घरात एकटी असताना धीरज अनिल पाटील हा जबरदस्तीने घरात शिरला. त्याने तरुणीचे तोंड दाबून शिवीगाळ करत आरडाओरड केल्यास जिवंत ठेवणार नाही अशी धमकी दिली. यानंतर त्याने तरुणीच्या अंगावर हात ठेवत तिचा विनयभंग केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.घटनेदरम्यान तरुणीने धैर्य दाखवत आरडाओरड केल्याने परिसरातील नागरिक तात्काळ मदतीला धावून आले. नागरिकांनी घरात आरोपीला पकडून ठेवले आणि त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली.

पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून धीरज अनिल पाटील याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमळनेरात पेट्रोल टंचाईची अफवा

## 'साठा उपलब्ध, घाबरू नका': प्रशासनाचे स्पष्टीकरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात आणि तालुक्यात पेट्रोलची कोणतीही टंचाई नसून काही पंप तात्पुरते बंद राहिल्यामुळे नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण झाला आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. माल संपल्यानंतर पंप एक-दोन दिवस बंद राहत असल्याने ग्राहकांकडून गरजेपेक्षा जास्त पेट्रोल भरून घेण्याची गर्दी होत असून त्यामुळेच टंचाईचा भास निर्माण होत आहे.

शहरातील प्रशांत निकम यांच्या शिव पेट्रोल पंपासंदर्भात बनावट सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी गेल्यामुळे सायबर गुन्हे शाखेकडून त्यांच्या तीन बँक खात्यांवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे आर्थिक व्यवहार अडचणीत आल्याने संबंधित पंप सध्या बंद ठेवावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर इतर पेट्रोल पंपांवर अतिरिक्त ताण निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

पेट्रोल पंपांना ठरावीक दिवसांनुसार मर्यादित साठा दिला जात असल्याने एखादा पंप बंद राहिल्यास इतर पंपांवर गर्दी वाढते. त्यातच रुग्णवाहिका, पोलीस आणि प्रशासकीय वाहनांसाठी आवश्यक साठा राखून ठेवण्याचे आदेश असल्याने काही वेळा ग्राहकांना पेट्रोल नाकारले जात असल्याचा गैरसमज पसरतो. सुरुवातीला नायरा पंपावर पेट्रोल उपलब्ध होते, तर आर.के. पेट्रोल पंप बंद होते. सध्या नायरा पंपावरील साठा संपला असला तरी आर.के.चे दोन्ही पंप सुरू झाले आहेत.




बोहरी पंपावरही नियमित पेट्रोल वाटप सुरू आहे. नायरा कंपनीचे पेट्रोल मुंबईवरून येत असून प्रत्येक पंपाला निश्चित कोटा दिला जातो. त्यामुळे नियोजित कालावधीनंतरच साठा उपलब्ध होतो. ग्राहकांकडून गरजेपेक्षा जास्त पेट्रोल भरून घेतल्यामुळे इतरांना त्रास होत असल्याचेही प्रशासनाने नमूद केले आहे.

> **नागरिकांनी घाबरू नये**
>
> **नागरिकांनी घाबरून जाऊ नये आणि गैरसमजाला बळी पडू नये. एखाद्या पंपावरील पेट्रोल संपले तरी इतर पंपावर लगेच पेट्रोल येते. पंपांवर जाऊन प्रत्यक्ष तपासणी केली आहे. काही ठिकाणी पोलीस बंदोबस्त देखील दिला आहे. संपले तरी लगेच पेट्रोल उपलब्ध होत आहे. वरिष्ठ पातळीवरून काहीही बंदी नाही.**
>
> **रुकसाना शेख,**
> पुरवठा निरीक्षक, अमळनेर

# प्रशासनातील विविध विभागांकडून सुनियोजनाची ग्वाही

पान १ वरून

प्रशासनाकडून सुरक्षा व्यवस्था अतिशय शिस्तबद्ध होऊन व कायदा-सुव्यवस्था पाळली जावी. आरोग्य विभागाकडून विविध सुविधा प्राप्त व्हाव्यात. पालिकेकडून भाविकांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था व्हावी. तसेच विविध दुकाने, खेळणी विक्रेते, पाळणेधारक यांना जागा उपलब्ध करून देताना सहकार्य करावे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शहरातील मुख्य मार्गांसह बोरी नदीपात्राकडे येणाऱ्या रस्त्यांची डागडुजीसह संपूर्ण रस्ते सुस्थितीचे व्हावेत. वाहन व्यवस्थेचेही नियोजन केले जावे. त्याचप्रमाणे महावितरणकडून बोरी नदीपात्रात रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा सुरळीत व्हायला हवा आदी आवश्यक त्या सूचना करून सहकार्याचे आवाहन केले. तसेच त्यांनी गेल्या वर्षी वीजपुरवठा खंडित झाल्याने दोन तास रथ एकाच ठिकाणी थांबला होता, याचीही आठवण करून दिली. त्यावर विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपापली भूमिका मांडली.

प्रांताधिकारी भंगाळे व तहसीलदार सुराणा म्हणाले, की यात्रोत्सव यशस्वितेसाठी सर्वच विभागांशी बोलणे झाले आहे. त्यादृष्टीने सर्वच पातळ्यांवर सुनियोजन केले जात आहे. त्यामुळे यात्रोत्सव सुरळीतपणे पार पडेल, अशी आम्ही ग्वाही देतो.

पोलीस निरीक्षक निकम म्हणाले, की सुरक्षा व्यवस्थेसह यात्रोत्सवकाळात कोणतीही गुन्हेगारी प्रवृत्ती या परिसरात शिरणार नाही, याकडे गंभीरतेने लक्ष पुरविले जाईल. यासंदर्भात जादा कुमक मागविणे वगैरेसारख्या विषयांवर विभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे जिल्हा पोलीस अधीक्षकांशी बोलणे झाले आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था चोख राखली जाईल.

पालिका मुख्याधिकारी शिंदे म्हणाले, की पालिकेतर्फे स्वच्छता, पाणीपुरवठा व्यवस्था तसेच वीज व्यवस्थेसाठी १२ मीटरचे ४ हायमास्ट दिवे नदीपात्रात यात्रोत्सव कालावधीत असतील. त्यामुळे प्रकाश व्यवस्था चांगली राहील. तसेच पाळणे, दुकाने, खेळणी विक्रेते यांचीही योग्य व्यवस्था लावून भाविकांना विविध सोयी-सुविधा पुरविण्याकडे संपूर्णपणे लक्ष पुरविले जाईल. कोणतीही अपूर्णता भासणार नाही.

महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता नेमाडे म्हणाले, की विजेचा जादा अधिभार इतर ट्रान्स्फॉर्मरवर कसे वळविता येईल, यासंदर्भात सहकाऱ्यांशी सातत्याने बोलणे सुरू आहे. मात्र, सद्यःस्थितीतील अधिक तापमान आणि जादा अधिभार या पार्श्वभूमीवर नवे ट्रान्स्फॉर्मरचीही मागणी वरिष्ठ पातळीवर करण्यात आली आहे. ते मिळाल्यास वीज नियंत्रणात ठेवणे सुलभ होईल. ते मिळाले तर उत्तमच होईल. मात्र जरी मिळाले नाहीत तरीही योग्य ते नियोजन केले जाईल.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता सोनवणे म्हणाले, की बैठकीतील सर्व विषयांसंदर्भात श्री. राऊत साहेबांशी चर्चा करून सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणाऱ्या सर्व बाबींकडे गंभीरतेने लक्ष पुरविले जाईल. यानंतर प. पू. संतश्री प्रसाद महाराजांच्या शुभ हस्ते सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रसाद वाटप करून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यानंतर बैठकीची सांगता झाली.

# काढणीसाठीचा मका शॉर्टसर्किटने खाक

**पान १ वरून :**

असलेल्या शेत शिवारात पैलाड भागातील शेतकरी रवींद्र कहारू पाटील (३ बिघे), प्रवीण बाबूलाल पाटील (५ बिघे) व समाधान खंडू पाटील (३.०५ बिघे) यांच्या शेतात काढणीसाठी मका पडून होता. आज दुपारी ४ वाजता शॉर्टसर्किटमुळे आग लागून तो संपूर्ण खाक झाला. तसेच ठिबकच्या नळ्याही आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने त्याही खाक झाल्या. यामध्ये एकूण साडेसहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधितांवर ऐन उन्हाळ्यात आर्थिक संकट कोसळले आहे.




*अमळनेर : भूमी सुपोषण चळवळ जनजागर रथाबद्दल माहिती जाणून घेतांना शेतकरी व ग्रामस्थ.*

# मातीचे आरोग्य वाचवण्यासाठी 'भूमी सुपोषण' रथाने गावोगावी जागविली सेंद्रिय शेतीची मशाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री मंगलग्रह मंदिर अमळनेर

माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः
भूमि सुपोषण एवं संरक्षण अभियान

अमळनेर: रासायनिक खतांच्या अतिवापराने आपल्या मातीचा पोत बिघडला असून शेतीचे नंदनवन वाळवंट होण्याच्या उंबरठ्यावर आहे. हे भयावह चित्र बदलण्यासाठी आणि आपल्या अन्नदात्या भूमीला पुन्हा एकदा 'सुजलाम-सुफलाम' करण्यासाठी एक क्रांती सुरू झाली आहे.

'भूमी सुपोषण राष्ट्रीय अभियाना'च्या माध्यमातून आता सेंद्रिय शेतीचा मंत्र घराघरांत आणि शेताच्या बांधाबांधांवर पोहोचत असून, मातीचे आरोग्य जपण्यासाठी शेतकरी वर्गाने आता कंबर कसली आहे.शुक्रवार, दि. २४ रोजी या जनजागृती रथाने निसरडी, पिंपळे बुद्रुक, चिमणपुरी पिंपरी, शिरसाळे, वावडे, आर्डी आनोरे, जवखेडा, आंचलवाडी, खडके, अटाळे आणि रणाईचे या गावांमध्ये भेट दिली.

जमिनीची सुपीकता टिकवणे, ही केवळ शेतीची गरज नसून ती आपली नैतिक जबाबदारी आहे, हा संदेश या अभियानाने प्रभावीपणे दिला आहे.अभियानाद्वारे प्रत्येक कुटुंबाला माहितीपत्रकांचे वाटप करण्यात येत आहे. यामध्ये रासायनिक शेतीमुळे मानवी आरोग्यावर होणारे घातक परिणाम आणि सेंद्रिय शेतीचे दीर्घकालीन आर्थिक व आरोग्यादायी फायदे स्पष्ट करण्यात आले आहेत. माती परीक्षण आणि नैसर्गिक खतांचा वापर वाढवण्यावर या मोहिमेत भर दिला जात आहे.

या महत्त्वाकांक्षी मोहिमेला महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाचे मोलाचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले आहे. 'अक्षय कृषी परिवार' आणि 'मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर' यांच्या संयुक्त विद्यमाने राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे कृषी क्षेत्रात एक नवी उमेद निर्माण झाली आहे.पारंपारिक रासायनिक शेतीला फाटा देऊन सेंद्रिय शेतीकडे वळण्याचा निर्धार करत असल्याचे चित्र सध्या अमळनेर तालुक्यात दिसून येत आहे. विशेषतः नवयुवक शेतकरी वर्ग या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी होत असून, मातीचे आरोग्य सुधरवण्यासाठी नवनवीन प्रयोग करण्यास उत्सुक दिसत आहे.

# महात्मा फुले आधुनिक भारताचे खरे निर्माते : डॉ. लीलाधर पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मानव मुक्तीचे तत्त्वज्ञान मांडणारे महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने आधुनिक भारताचे निर्माते होते असे प्रतिपादन डॉ लीलाधर पाटील यांनी केले महात्मा फुले जयंतीच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त युवा कल्याण प्रतिष्ठान संविधान जागर अभियान व मराठा सेवा संघाच्या वतीने आयोजित संयुक्त कार्यशाळेत ते बोलत होते. प्रताप महाविद्यालयाच्या साने गुरुजी सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून धनदाई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. पाटील, प्रा. अशोक पवार आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते. महात्मा फुले




*अमळनेर : डॉ. लिलाधर पाटील सह अशोक पवार, डॉ. हर्षवर्धन जाधव आदी.*

यांच्या जीवनातील घटनांना जरी विशिष्ट स्थळ आणि वेळेची चौकट असली तरी त्यांनी निर्माण केलेल्या ज्ञानाला ही चौकट नाही आणि म्हणून त्यांच्या या द्विशताब्दी वर्षात या तत्त्वांचा प्रचार प्रसार करण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध व्हावे असे आव्हानही डॉ. पाटील यांनी केले.

युवा कल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा अशोक पवार यांनी सांगितले की, " महात्मा ज्योतिराव फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्षात 200 व्याख्याने, कार्यशाळा, चर्चासत्र, प्रदर्शन, पथनाट्य, परीक्षा, गीते इत्यादी कार्यक्रम जळगाव,धुळे, नंदुरबार या जिल्ह्यात राबवून सुमारे 2 लाख नागरिक, विद्यार्थी,महिला, शेतकरी, कष्टकरी यांचे पर्यंत पोहोचण्याचा संकल्प सर्वांच्या सहकार्याने पूर्ण करण्याचे जाहीर केले. सूत्रसंचालन डी ए पाटील यांनी केले तर दिशा संदानशिव, भारती कोळी, श्रद्धा रेरा, निवेदिता कापडणेकर, उषा देवरे, बापूराव ठाकरे, दयाराम पाटील,अशोक बिऱ्हाडे, प्रा अशोक पवार यांनी महात्मा फुले यांच्यावरील गीताने कार्यक्रमाला सुरुवात केली. प्रताप



*अमळनेर : व्याख्यानासाठी उपस्थित श्रोते.*

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ हर्षवर्धन जाधव यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले कि आपण वर्षभर महात्मा फुले विषयी जे कार्यक्रम आयोजित कराल त्यात प्रताप कॉलेजचा सहभाग असेल, मदत व सहकार्य असेल, असे सांगून कार्यशाळेच्या आयोजकांचे अभिनंदन केले.

कार्यशाळेला पाचोरा कॉलेजचे माजी प्राचार्य बी एन पाटील, प्रा सुभाष पाटील, संदीप घोरपडे,सोमचंद सदानशिव,डॉ भारती पाटील खलील देशमुख,वसुंधरा लांडगे, रामेश्वर भदाणे, योगेश पाटील, नगरसेविका योगिता पाटील, आरती पाटील,रियाज मौलाना, भीमराव महाजन,, प्रा डॉ संदीप नेरकर, प्रा डॉ नितीन पाटील, प्रा डॉ सरवदे,वाल्मीक मराठे, डी एम पाटील, ईश्वर महाजन, पुरुषोत्तम माळी, रामकृष्ण महाजन,प्रकाश महाजन,आशा महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी संजय पाटील, हृदयनाथ मोरे, मिलिंद निकम बाबुराव ठाकरे,श्रद्धा रे रा,दिशा संदानशिव,निखिल रांजणकर, अशोक बिऱ्हाडे,,सोपान भवरे गोकुळ पाटील,,गुणवंत पवार आदींनी परिश्रम घेतले प्रा डॉ राहुल निकम यांनी आभार प्रदर्शन केले प्रताप महाविद्यालयाचे साने गुरुजी सभागृह खचून भरले होते खूप चांगला प्रतिसाद मिळाल्याच्या भावना आयोजकांनी व्यक्त केल्या.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



जागतिक मलेरिया दिन विशेष



# जागरूकता, प्रतिबंध आणि निर्मूलनाची दिशा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी २५ एप्रिल रोजी हा दिवस संपूर्ण जगभरात जागतिक मलेरिया दिन साजरा केला जातो. या दिनाचा उद्देश मलेरियाबाबत जनजागृती करणे, प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे आणि या आजाराच्या निर्मूलनासाठी जागतिक स्तरावर प्रयत्नांना चालना देणे हा आहे. जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) या संस्थेच्या पुढाकाराने २००७ पासून हा दिवस अधिकृतपणे पाळला जात आहे.

**मलेरिया म्हणजे काय?**

मलेरिया हा एक संसर्गजन्य रोग असून तो प्लाझ्मोडियम या परजीवीमुळे होतो. हा परजीवी संक्रमित मादी अनॉफिलीस डासांच्या चाव्यामुळे मानवाच्या शरीरात प्रवेश करतो. ताप, थंडी वाजणे, घाम येणे, डोकेदुखी, उलट्या अशी त्याची सामान्य लक्षणे आहेत. योग्य वेळी उपचार न झाल्यास हा आजार गंभीर रूप धारण करू शकतो आणि मृत्यूही ओढवू शकतो.

**जागतिक व राष्ट्रीय परिस्थिती**

जगातील अनेक उष्णकटिबंधीय व उपोष्णकटिबंधीय देशांमध्ये मलेरिया मोठ्या प्रमाणावर आढळतो. आफ्रिका खंडात याचे प्रमाण सर्वाधिक आहे. भारततही मलेरिया हा एक महत्त्वाचा सार्वजनिक आरोग्य विषय राहिला आहे, जरी मागील काही वर्षांत त्यावर नियंत्रण मिळवण्यात यश आले आहे. सरकारच्या विविध मोहिमा, स्वच्छता उपक्रम आणि वैद्यकीय सुविधांमुळे रुग्णसंख्येत घट झाली आहे.

**मलेरिया होण्याची कारणे**

- साचलेले पाणी व अस्वच्छ परिसर
- डासांची वाढ होण्यासाठी पोषक वातावरण
- प्रतिबंधात्मक उपायांकडे दुर्लक्ष
- आरोग्यसेवा व औषधोपचारांचा अभाव

**प्रतिबंधात्मक उपाय**

- मलेरिया टाळण्यासाठी खालील उपाय प्रभावी ठरतात.
- घराभोवती पाणी साचू न देणे
- डासजाळी, रिपेलंट्स व कॉइल्सचा वापर
- पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करणे
- नियमित फवारणी व स्वच्छता राखणे
- ताप आल्यास त्वरित वैद्यकीय तपासणी करणे

**शासन व समाजाची भूमिका**

मलेरियाविरुद्धच्या लढ्यात शासन आणि समाज यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शासनाकडून आरोग्य मोहिमा, मोफत तपासणी व औषधोपचार उपलब्ध करून दिले जातात. दुसरीकडे, नागरिकांनीही स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारून जागरूक राहणे गरजेचे आहे. जागतिक मलेरिया दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून, तो आपल्याला आरोग्याबाबत सजग राहण्याची आठवण करून देतो. "प्रतिबंध हा उपचारापेक्षा श्रेष्ठ" या तत्त्वानुसार आपण सर्वांनी एकत्रित प्रयत्न केल्यास मलेरियाचे संपूर्ण निर्मूलन शक्य आहे. स्वच्छता, जागरूकता आणि वेळेवर उपचार यांमुळे आपण निरोगी समाज घडवू शकतो.

# एकाच नावावर बनले ३ चित्रपट; पहिला सुपरहिट

## दुसरा ब्लॉकबस्टर अन् तिसरा ऑल टाइम ब्लॉकबस्टर; प्रत्येक वेळी व्हिलनच मारतो बाजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

या सीरिजचा पहिला भाग आला तेव्हा कोणालाच कल्पना नव्हती की या चोर-पोलीसच्या खेळात प्रेक्षक चोराच्या प्रेमात पडतील. बॉलिवूडमध्ये कधी कोणता चित्रपट हिट होईल हे सुरूवातीलाच सांगणे कठीण आहे. अनेकदा सुपरस्टार्सचे बिग बजेट सिनेमे बॉक्स ऑफिसवर आपटतात. पण तेच नवख्या कलाकारांचे सिनेमे कमाल करून जातात. अशातच २००४ मध्ये एक सिनेमा आला, ज्यामध्ये एक पोलीस आणि एक चोर यांच्यातील गोष्ट दाखविण्यात आली होती. ही फ्रँचायझी म्हणजे 'धूम'. या फ्रँचायझीचे सर्वात




मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे लोक अभिषेक बच्चन किंवा उदय चोप्रा यांच्यासाठी नाही, तर पडद्यावर धुमाकूळ घालणाऱ्या त्या स्टायलिश व्हिलनसाठी थिएटरमध्ये गर्दी करायचे.

धूमच्या पहिल्या भागात अभिषेक मुख्य भूमिकेत होता, तर जॉन अब्राहमने डॅशिंग व्हिलनची भूमिका साकारली. जशी पडद्यावर लांब केस आणि सुझुकी हायाबुसा घेऊन 'कबीर'च्या रूपात जॉन अब्राहमची एंट्री झाली, तसे थिएटरमध्ये शिट्ट्यांचा पाऊस पडला. जॉनने पहिल्यांदाच व्हिलनला इतके कूल बनवले. तो इतका देखणा आणि चलाख होता की, प्रेक्षक पोलिसांपेक्षा त्या चोराचे चाहते झाले. क्लायमॅक्समध्ये जेव्हा जॉन बाईकसह दरीत उडी मारतो, तेव्हा प्रेक्षकांचा त्यांच्या डोळ्यांवर विश्वास बसेनासा झाला होता. २९ कोटींची कमाई करत हा चित्रपट सुपरहिट ठरला होता. ही फिल्म रिलीज झाल्याच्या दोन वर्षांनी २००६ साली 'धूम २' रिलीज झाला. यावेळी मुख्य भूमिकेत अभिषेक बच्चन होता, मात्र, चोराच्या भूमिकेची धुरा हृतिक रोशनने सांभाळली. यावेळी हृतिक रोशनने फिल्ममध्ये पोलिसांना चकमा देण्यासाठी जितकी रूपं बदलली, प्रेक्षक त्या सर्व रूपांच्या प्रेमात पडले होते. हृतिकचे डान्सिंग, त्याचे स्टंट्स आणि ऐश्वर्या रायसोबतची त्याची केमिस्ट्री इतकी जबरदस्त होती की, अभिषेक बच्चन हिरो असूनही तो कुठेच उठून दिसला नाही. प्रेक्षक विसरून गेले होते की हृतिक हा एक गुन्हेगार आहे. या चित्रपटाने १५० कोटींचा गल्ला जमवत बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टरचा मान मिळविला. २०१३ मध्ये 'धूम ३' आला आणि आदित्य चोप्राने थेट मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खानला मैदानात उतरवलं. शिकागोच्या पार्श्वभूमीवर विजय आणि समर या दोन जुळ्या भावांची कथा आमिरने ज्या ताकदीने साकारली, त्यासमोर पुन्हा एकदा पोलीस फिके पडताना दिसले. बीएमडब्ल्यू बाईक्स आणि सर्कसचे खतरनाक स्टंट्स पाहून प्रेक्षक थक्क झाले. आमिरचा व्हिलन हा केवळ एक गुन्हेगार नव्हता, तर त्याला एक भावनिक किनार होती. ५०० कोटींचा टप्पा ओलांडणारा हा पहिला भारतीय चित्रपट ठरला आणि ऑल टाइम ब्लॉकबस्टर झाला.

# बाबा वेंगांची सोन्यावर मोठी भविष्यवाणी !

## सत्य झाल्यास बसेल मोठा धक्का



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात सोन्याला प्रचंड महत्त्व आहे. हे फक्त धातू नाही, तर शुभंही मानले जाते. यासोबतच भावना, स्टेटस आणि संकटकाळातील साथीदारही मानले जाते. ईरान युद्धासह ग्लोबल मार्केटमध्ये सुरू असलेल्या अनेक घटनांमुळे सोन्याच्या किंमतींना आग लागली आहे. गेल्या एक वर्षात सोन्याच्या किंमती ८० टयांहून जास्त वाढल्या. सध्या सोने आणि चांदींच्या किंमतीत थोडी घट दिसतेय.

पण बाबा वेंगांची एक भविष्यवाणी सांगते की, येत्या काळात सोन्याच्या किंमती आणखी वाढू शकतात.बाबा वेंगा यांना 'बाल्कन नोस्ट्राडेमस' च्या नावानेही ओळखले जाते.त्यांनी २०२६ साठी काही भविष्यवाणी केली आहे, ज्या वेगाने सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ते म्हणाले की, या वर्षी जगभरात एक मोठे आर्थिक संकट येणार आहे. बँकिंग प्रणाली स्लो होऊ शकते. यावेळी लोकांचा कागदी मुद्रेवरील विश्वास उठेल.

तेव्हा प्रत्येकजण सोन्याकडे वळेल. याचा परिणाम असा होईल की, सोन्याच्या किंमती प्रचंड वाढतील. याच्या किंमती एवढ्या वाढतील की, ज्याची आपण कल्पनाही केली नसेल.बाबा वेंगांनी सांगितलं की, आर्थिक संकटादरम्यान सोन्याच्या किमंतीत २५ ते ४० टक्के उसळी येण्याची शक्यता दिसतेय. हा अंदाज योग्य निघाला तर सध्याचा दर १० ग्राम सोन्याच्या किंमत १.९ लाख रुपयांवरुन २.१ लाख रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. ही किंमत २०२६ मध्येच आकड्याला पार करू शकते.

तसं पाहिल्यास हे अशक्य वाटते आहे. पण इराण युद्ध दीर्घकाळ चालले तर सोन्याच्या किंमतीत मोठी उसळी पाहायला मिळू शकते.खरेतर ज्यावेळी जगात युद्धासारखी स्थिती असते, तेव्हा गुंतवणूकदार हे सुरक्षित गुंतवणुकीकडे वळतात. मध्य पूर्वेत तणाव असुनही सोन्याच्या किंमतीत किरकोळ घसरण झाल्याने आर्थिक विश्लेषकांना धक्का बसला आहे.

अनेक लोक मानतात की, या किंमती वेगाने वाढ होण्यापूर्वी मिळालेला एक लहानसा दिलासा आहे.सध्या देशात लग्नाचा मौसम सुरू आहे. सणासारख्या शुभ प्रसंगीही लोक मोठ्या प्रमाणात सोने खरेदी करतात. अशावेळी बाबा वेंगांच्या या भविष्यवाणीने मध्यम वर्गाला चिंतेत टाकले आहे. जर १० ग्राम सोन्याची किंमत २ लाखांच्या पार गेली तर सामान्य व्यक्तीसाठी सोने खरेदी करणे हे स्वप्न राहील. यामुळे दक्षिण भारतात सोन्याचे वेड असणाऱ्यांना मोठा धक्का बसेल. येथे देशातील सर्वात जास्त सोने पुरवले जाते.कमोडिटी एक्सपर्ट मानतात की, बाबा वेंगांची भविष्यवाणी काहीही असली तरीही सोन्याच्या किंमती फक्त अफवांनी ठरत नाहीत. अमेरिकी फेडरल रिझर्व्हचे निर्णय, रुपयाचे अवमूल्यन आणि महागाईही सोन्याची किंमत वाढवण्याचे काम करते. युद्धामुळे जास्तीत जास्त गोष्टींच्या पुरवठ्यावर परिणाम होतो आणि त्याच्या किंमतीही वाढल्या आहेत. युद्ध दीर्घकाळ चालले तर नक्कीच परिणाम होईल. मग यावर उपाय निघाला तर किंमती आणखी खाली येऊ शकतात.कमोडिटी तज्ञ म्हणतात की,बाबा वेंगांच्या या भविष्यवाणीच्या भितीने गुंतवणूक करण्यापूर्वी बाजारातील स्थितीची माहिती घेणे महत्त्वाचे ठरते. सोने नेहमीच सुरक्षित गुंतवणूक मानली जाते.

पण यात जास्त पैसा लावताना आपल्या आर्थिक योजनांनुसार निर्णय घेणे बेस्ट ठरते. बाजारात मंदीच्या वेळी टप्प्याटप्प्याने सोने खरेदी करणे फायदेशीर ठरू शकते.बाबा वेंगांची भविष्यवाणी यापूर्वीही सत्य झाली आहे. यावेळी फायनेंशियल क्रॅशमुळे त्यांच्या भविष्यवानीचे संकेतही दिसू लागले आहेत. जगातील अनेक भागांमध्ये आर्थिक पतनाचे संकेत पहिले दिसू लागले आहेत. याच कारणामुळे यावेळीही त्यांचा इशारा गांभीर्याने घेतला जातोय.बँकांवरील विश्वास जेवढा कमी होईल, बाजारात सोन्याचे मूल्य तेवढेच वेगाने वाढेल. याच कारणामुळे सोन्याच्या किंमतीत येत्या काळात उसळी पाहायला मिळू शकते.

# अशा १० वस्तू ज्यांना नसते एक्सपायरी डेट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## फक्त साठवताना 'या' गोष्टी ठेवा लक्षात



अनेकदा सेल लागला म्हणून किंवा आपत्कालीन परिस्थितीसाठी आपण सामानाची साठवणूक करतो. अशा वेळी कोणत्या वस्तू वर्षानुवर्षे टिकतील आणि आपले पैसे वाचवतील, हे माहिती असणे गरजेचे आहे.

आपण जेव्हा किराणा दुकानात जातो किंवा ऑनलाईन ग्रोसरी ऑर्डर करतो, तेव्हा आपली नजर सर्वात आधी कशावर जाते? नक्कीच, ती म्हणजे पॅकेटवर असलेली एक्सपायरी डेट. दूध, ब्रेड किंवा दही आणताना आपण खूप काळजी घेतो की ते खराब तर होणार नाही ना? पण आपल्याला माहीत आहे का, आपल्या स्वयंपाकघरात अशा काही गोष्टी दडलेल्या आहेत ज्यांची मुदत कधीच संपत नाही.

अनेकदा सेल लागला म्हणून किंवा आपत्कालीन परिस्थितीसाठी आपण सामानाची साठवणूक करतो. अशा वेळी कोणत्या वस्तू वर्षानुवर्षे टिकतील आणि तुमचे पैसे वाचवतील, हे माहिती असणे गरजेचे आहे. चला तर मग अशा १० अजरामर खाद्यपदार्थांबद्दल जाणून घेऊया.

**१) नैसर्गिक अमृत (मध) :** मध हा जगातील एकमेव असा पदार्थ आहे जो कधीही खराब होत नाही. मधमाश्या ज्या पद्धतीने मध बनवतात आणि ज्या प्रक्रियेतून ते जाते त्यामध्ये बॅक्टेरिया जगणे अशक्य असते. इजिप्तमधील पिरॅमिड्समध्ये संशोधकांना ५५०० वर्षे जुने मध सापडले होते आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते आजही खाण्यायोग्य होते.

**२) पांढरा तांदूळ :** ब्राऊन राईसमध्ये नैसर्गिक तेलाचे प्रमाण जास्त असल्याने तो ६ महिन्यांत खराब होऊ शकतो. मात्र, पांढरा तांदूळ जर ओलाव्यापासून लांब आणि हवाबंद डब्यात ठेवला, तर तो आयुष्यभर चांगला राहू शकतो.

**३) मीठ :** हे स्वतःच एक संरक्षक आहे. समुद्रातून किंवा खाणीतून येणारे मीठ जोपर्यंत ओले होत नाही तोपर्यंत ते कधीच खराब होत नाही. त्यामुळे मिठाच्या साठवणुकीची अजिबात काळजी करू नका.

**४) सोया सॉस :** यामध्ये मिठाचे प्रमाण प्रचंड असते आणि तो आंबवलेला असतो. जर सोया सॉसचं बाटलीचं सील उघडलं नसेल, तर तो कधीही 'एक्सपायर' होत नाही. बाटली उघडल्यानंतरही फ्रीजमध्ये ठेवल्यास तो १ वर्षापेक्षा जास्त काळ उत्तम राहतो.

**५) सुकी कडधान्ये :** डाळी आणि कडधान्ये ही आपत्कालीन साठवणुकीसाठी सर्वोत्तम आहेत. एका संशोधनानुसार कडधान्ये ३० वर्षांनंतरही खाण्यायोग्य राहू शकतात. कदाचित त्यांची चव थोडी बदलू शकते, पण ती आरोग्यासाठी घातक नसतात.

**६) मस्टर्ड किंवा मोहरीचा सॉस :** मस्टर्डची बाटली जर उघडली नसेल, तर ती तिच्या 'बेस्ट बिफोर' तारखेच्या नंतरही २ ते ३ वर्षे चांगली राहू शकते. उघडल्यानंतर फ्रीजमध्ये ठेवल्यास १ वर्षापर्यंत त्याचा वापर करता येतो.

**७) नारळाचे दूध :** जर तुम्हाला पावडर दूध आवडत नसेल, तर कॅनमधील नारळाचे दूध हा उत्तम पर्याय आहे. स्वयंपाकासाठी किंवा बेकिंगसाठी याचा वापर करता येतो. कॅन उघडला नसेल तर हे दूध १ वर्षापेक्षा जास्त काळ टिकते.

**८) लाल वाईन :** वाइन्सबाबत एक म्हण आहे, "ती जितकी जुनी, तितकी चांगली." व्यावसायिक वाइन्स १ ते ३ वर्षे टिकतात, पण दर्जेदार 'फाईन वाईन' कित्येक दशके चांगली राहू शकते. अट फक्त एकच बाटली सीलबंद असावी.

**९) ऑलिव्हज :** मार्टिनीमध्ये वापरले जाणारे किंवा स्नॅक्स म्हणून खाल्ले जाणारे ऑलिव्हज जर सीलबंद जारमध्ये असतील, तर ते ३ वर्षांपर्यंत खराब होत नाहीत.

**१०) पॉपकॉर्न :** हे बनविल्यानंतर ते लवकर मऊ पडतात, पण पॉपकॉर्नचे दाणे मात्र कित्येक वर्षे टिकतात. ते फक्त कोरड्या जागी ठेवणे आवश्यक आहे.

# अंगणवाडी सेविकेचा मुलगा झाला उपजिल्हाधिकारी

## म्हैसाळचा मानतेश पाटील आर्थिक दुर्बल घटकातून राज्यात प्रथम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी



अमळनेर : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या राज्यसेवा परीक्षेतून म्हैसाळ (ता. मिरज) येथील मानतेश पिरगोंडा पाटील यांची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाली. आर्थिक दुर्बल घटक या प्रवर्गात मानतेश यांनी राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांचे वडील शेतमजूर, तर आई अंगणवाडी सेविका आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून मानतेश यांनी हे यश मिळविले आहे.

राज्यसेवेची पूर्वपरीक्षा दि. १ डिसेंबर २०२४ रोजी झाली. मुख्य परीक्षा जून २०२५ मध्ये, तर मुलाखत ऑक्टोबर २०२५ मध्ये झाली. या परीक्षेचा तात्पुरता निकाल दि. ५ जानेवारी २०२६ रोजी लागला होता. बुधवार, दि. ८ एप्रिल रोजी अंतिम निकाल जाहीर झाला. यामध्ये मानतेश पाटील यांची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाली.

**दि बिगेस्ट फेस्टिव्ह ऑफर**

मानतेश यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नं. १ म्हैसाळ येथे झाले. माध्यमिक शिक्षण म्हैसाळच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात झाले. मिरज येथे बापूजी साळुंखे कला, वाणिज्य व विज्ञान कॉलेजमध्ये अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केले. सांगलीत विलिंग्डन महाविद्यालयातून त्यांनी बीएससीची गणित या विषयातून पदवी घेतली. इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठातून एम.ए. (सामाजिक शास्त्र) ही पदव्युत्तर पदवी घेतली. त्यांनी अतिशय खडतर परिस्थितीतून शिक्षण घेतले. खासगी नोकरी करत राज्यसेवा परीक्षेची तयारी केली. त्यांची उपजिल्हाधिकारीपदी निवड झाली आहे. त्यांच्या या यशाचे कौतुक होत आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# पवित्रता, त्याग, संयम आणि धैर्य यांचे मूर्तिमंत प्रतीक

## सीता नवमी विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील पवित्र सणांपैकी एक असलेली सीता नवमी जिला जानकी जयंती असेही म्हटले जाते. हा दिवस माता सीता यांचा जन्मदिन म्हणून मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. वैशाख महिन्यातील शुक्ल पक्षातील नवमी तिथीला हा उत्सव साजरा होतो. या दिवशी माता सीता यांच्या आदर्श जीवनाचे स्मरण करून त्यांच्या गुणांचे आचरण करण्याचा संदेश दिला जातो.

**माता सीतेचा जन्म आणि महत्त्व**

रामायणानुसार सीता या मिथिला नगरीचे राजा जनक यांच्या कन्या होत्या. शेतात नांगरणी करताना राजा जनकांना त्या सापडल्या म्हणून त्यांना 'भूमीपुत्री' असेही संबोधले जाते. सीता म्हणजे पवित्रता, त्याग, संयम आणि धैर्य यांचे मूर्तिमंत प्रतीक मानले जाते.

**रामायणातील सीतेचे स्थान**

रामायण या महाकाव्यात सीता ही केवळ भगवान राम यांची पत्नी नसून, त्या एक आदर्श स्त्री, समर्पित पत्नी आणि कर्तव्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व म्हणून उभ्या राहतात. वनवास, रावणाचे अपहरण आणि अशोकवाटिकेत केलेला संघर्षया



सर्व प्रसंगांमध्ये त्यांच्या धैर्याची आणि श्रद्धेची प्रचिती येते.

**आध्यात्मिक संदर्भ**

सीता नवमी हा केवळ धार्मिक सण नाही, तर तो आध्यात्मिक चिंतनाचा दिवस आहे. माता सीता यांच्या जीवनातून आपल्याला अनेक मूल्ये शिकायला मिळतात.

त्याग आणि सहनशीलता : कठीण परिस्थितीतही त्यांनी कधीही धर्माचा मार्ग सोडला नाही.

**निष्ठा आणि प्रेम :** भगवान रामांप्रती त्यांची अढळ निष्ठा आदर्श मानली जाते.

**शक्ती आणि स्वाभिमान :** अशोकवाटिकेत त्यांनी रावणाच्या प्रलोभनांना न जुमानता स्वाभिमान जपला.

सीता म्हणजे केवळ कोमलता नव्हे, तर अंतर्मनातील शक्तीचे प्रतीक आहे. त्या आपल्याला शिकवतात की, संकटांमध्येही धैर्य आणि श्रद्धा कायम ठेवावी.

**सण साजरा करण्याची पद्धत**

या दिवशी भक्तजन उपवास करतात, रामायणाचे पठण करतात आणि मंदिरात जाऊन पूजा-अर्चा करतात. विशेषतः मिथिला आणि अयोध्या येथे हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. काही ठिकाणी सीता-राम विवाहाचे नाट्यरूप सादरीकरणही केले जाते.

**समाजासाठी संदेश**

आजच्या आधुनिक युगात सीता नवमी आपल्याला नैतिक मूल्यांची आठवण करून देते. कुटुंबव्यवस्थेतील नाती, परस्पर आदर आणि निष्ठा टिकवण्यासाठी माता सीतेचे जीवन मार्गदर्शक ठरते. स्त्रीच्या सामर्थ्याला ओळखून तिच्या सन्मानाचे महत्त्व अधोरेखित करण्याची गरजही हा दिवस सांगतो. सीता नवमी हा सण श्रद्धा, संयम आणि आदर्श जीवनमूल्यांचा संदेश देणारा आहे. माता सीतेच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण आपल्या जीवनात सत्य, धर्म आणि प्रेम यांचा अंगीकार केल्यास समाज अधिक सुसंस्कृत आणि समृद्ध होऊ शकतो.

# भक्तांच्या श्रद्धेचे केंद्रबिंदू आदिशक्ती भवानी माता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आदिशक्ती भवानी मातेचा जोगवा संत एकनाथांनी आपल्या मुखाद्वारे प्रकट केला आहे. त्यातून त्यांनी भक्तांना मातेविषयीची भक्ती कशी असावी? माता कशा भक्तांना पावते, याचाही उलगडा केला आहे.

**अनादी निर्गुण (जोगवा)**

**अनादी निर्गुणी निर्गुणी प्रगटली भवानी। अहं महिषासूर महिषासुर, मर्दना लागुनी । त्रिविध तापाची तापाची करावया झाडणी । भक्ता लागी तू लागी तू पावशी निर्वाणी । ऐसा जोगवा, जोगवा जोगवा मागेन।**

बाराव्या शतकापासून अस्तित्वात असलेले आदिशक्ती भवानी माता संस्थान हे आजही भक्तांच्या श्रद्धेचे केंद्रबिंदू ठरले आहे. या देवीबद्दल असा समज आहे, की पायरीवर नारळ फोडल्यास देवी भक्ताच्या मनोकामना पूर्ण करते. येथे देवीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो. विशेष म्हणजे या ठिकाणी बळी प्रथा नाही. अशी भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारी मानोरा तालुक्यातील डोगरावर असलेली डोगरगावची आदिशक्ती भवानी माता आहे.

धर्मशास्त्रात पाच प्रमुख देवता मानल्या गेल्या आहेत. विष्णू, शंकर, सूर्य, गणपती व देवी. त्यापैकी देवी ही जगाची जननी, अनादी आहे. अनादी निर्गुण प्रगटली भवानी. त्यामुळे देवीच्या शरण गेल्यानंतर भक्तास सुख शांती मिळते. महाराष्ट्रात साडेतीन शक्तिपीठ मानली जातात. कोल्हापूर महालक्ष्मी, तुळजापूर तुळजाभवानी, माहूर रेणुकामाता, सप्तशृंगी (अर्धपीठ), याच तुळजापूर देवीचा अवतार म्हणजेच डोंगरगावची भवानी माता होय. दररोज सकाळी साडेसहाला होणाऱ्या देवीच्या आरतीला भक्त उपस्थित असतात. मंदिर परिसर निसर्ग रम्य असून दर्शनानंतर समाधान लाभते. देवीला कुलदैवत व ग्रामदेवत म्हणूनही मानले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदैवत भवानी माता होती. महाराजांच्या हातातील विजयी तलवार हिच्या आशीर्वादाने मिळाली होती. महिषासुराचा करण्यासाठी देवीने नऊ दिवस युद्ध केले. त्यामुळे नवरात्र उत्सव नऊ दिवस साजरा केला जातो.





# उंबर : एक आध्यात्मिक वृक्ष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उंबर अर्थात औदुंबर जेथे आहे तिथे श्री दत्तगुरुंचा वास असतो, असे हिंदू धर्मात मानले जाते. याच्या औषधी गुणांमुळेच उंबराच्या वृक्षाला आध्यात्मिक महत्त्व आहे. तेव्हा हा वृक्ष आपल्याला अमाप अशी निसर्गदत्त, औषध योजना बहाल करतो.

उंबराच्या सालीचा काढा करून त्यात वेलची, खडीसाखर टाकून सरबत करावे, कॅन्सरसारख्या रुग्णाच्या अंगाचा जो दाह होतो त्यावर आराम पडतो. दिवसांतून तीनदा घ्यावे. 'औदुंबरावलेह' हे प्रसिद्ध औषध पित्तज विकारांवर प्रसिद्ध आहे. जखम झाल्यास याच काढ्याने धुतल्यास ती वेगाने बरी होते. अतिसाराच्या वेळी रक्त पडल्यास हाच काढा घ्यावा. गर्भाशयाची सूज कमी करण्यासाठी, रक्तप्रदर, श्वेतप्रदर, मासिक धर्म जास्त जात असेल, तर सालीचा काढा पोटातून देतात. गर्भपात होऊ नये म्हणून गर्भाचे पोषण नीट व्हावे म्हणून याच्या सालीचा काढा घेतात.

भस्मक नावाचा रोग आहे त्यात सारखी भूक लागते. पोट भरल्याची जाणीव होत नाही. तेव्हा उंबराची साल दुधात घोटून द्यावी. काविळीत उंबराचे पिकलेले अर्धे पान विड्यातून देतात. ज्वरदाह, तीव्र तापात पिकलेले उंबर द्यावे. गोवर, कांजण्या, अतिसार, उन्हाळी, मधुमेह या सर्व रोगांवर उंबराचे फळ, पाने, फुले उपयोगात आणली जातात.

कीटकदंश, विंचूदंश झाल्यास झाडाची पाने वाटून लावल्यास दाह, वेदना, कमी होतात. तोंडातील अल्सर, व्रण, छाले यावर उंबराच्या पानावर असे बुडबडे वर दिसतात. ते काढून त्याची चटणी मधातून चाटण म्हणून द्यावे. तोंडाचा दाह कमी होतो. अंगात उष्णता, कडकी असल्यास उंबराची दोन फळे रोज सकाळी खडीसाखरेसोबत खावीत. तृष्णेचा आजार बरा होतो. जेव्हा खूप तहान, तहान होते, जीव कासावीस होतो तेव्हा उंबराची साल, वा कच्ची फळे पाण्यात कुस्करून सरबत करून द्यावे. डांग्या खोकल्यावर उंबराचा चिक टाळूवर लावावा ताबडतोब थांबतो.

किडनी स्टोन (मूतखडा) : उंबराच्या जुन्या झाडाच्या खोडाला खाच द्यावी व तेथेच एक भांडे अडकावे. रात्रभर रस झिरपून भांड्यात गोळा होईल, तो सकाळी पिण्यास घ्यावा. किडनी स्टोन वितळून मूत्रावाटे बाहेर पडतात. उंबर फळ दुधात शिजवून खाल्ल्यास पचनसंस्था मजबूत होते, पोटाचे सर्व विकार बरे होतात. विशेषतः हे थंड गुणधर्माचे असल्यानेच आम्लपित्त, मळमळ, पोटात दाह, अल्सरसारखे आजार याच्या सेवनाने बरे होतात.


## श्रीरंगमचे गूढ रहस्य

# घनदाट जंगलातील भगवान नरसिंहाची थरारक गाथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपणास कधी हा प्रश्न पडला आहे का की जगातील सर्वांत मोठ्या आणि भव्य मंदिरांपैकी एक असलेल्या श्रीरंगम मंदिराचे रक्षण साक्षात एक उग्र देव करतो; पण तो का करतो हे माहिती आहे का? भगवान विष्णूंच्या दिव्य अवतारांची आणि चमत्कारांची गाथा नेहमीच भक्तांना मंत्रमुग्ध करणारी आहे. पण तमिळनाडूतील त्रिची येथील श्रीरंगम मंदिराचा इतिहास आणि भगवान नरसिंहांचा या भूमीशी असलेला संबंध आजही अनेकांसाठी एक गूढ आणि विलोभनीय रहस्य आहे. श्रीरंगमचे मुख्य रंगनाथस्वामी मंदिर आणि तेथील पूर्वेला असलेले 'काट्टू अझगिया सिंगर' म्हणजेच भगवान नरसिंहांचे मंदिर हे एकमेकांशी एखाद्या अतूट धाग्याप्रमाणे जोडलेले आहेत.

प्राचीन काळी जेव्हा श्रीरंगमचे सात तट (प्राकार) आणि भव्य गोपुरे अस्तित्वात नव्हती, तेव्हा हे संपूर्ण क्षेत्र एका अतिशय भयानक आणि अंधाऱ्या जंगलाने व्यापलेले होते, जेथे सूर्याचा प्रकाशही जमिनीवर पोहोचणे कठीण होते. याच निबिड अरण्यात प्राचीन काळी अनेक ऋषी-मुनींनी आपली कठोर तपश्चर्या सुरू केली होती, ज्यांच्या तपोबलाने या मातीला एक वेगळीच



अध्यात्मिक ऊर्जा प्राप्त झाली. मात्र, याच काळात ऋषींची एक मोठी समस्या समोर आली; त्या घनदाट जंगलात वास्तव्य करणाऱ्या ऋषींना हिंस्त्र श्वापदे, जीवघेणे प्राणी आणि काही दुष्ट शक्तींच्या छळाला सामोरे जावे लागत होते. या दुष्ट शक्तींनी ऋषींच्या जीवनात एक अचेतन शांतता आणि भीती निर्माण केली होती. आपल्या भक्तांची ही व्याकुळता पाहून आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी साक्षात महाविष्णूंनी अत्यंत रौद्र अशा उग्र नरसिंह रूपात तेथे प्रकट होण्याचा निर्णय घेतला, ज्याला स्थानिक भाषेत 'उकिरा अवतार' असेही म्हटले जाते. नरसिंहाच्या त्या महाभयंकर गर्जनेने संपूर्ण जंगल हादरले आणि दुष्ट शक्तींचा नाश झाला.

नरसिंहाचा हा अवतार दिसायला कितीही उग्र आणि रागात असला, तरी त्यांच्या भक्तांनी त्यांना अतिशय प्रेमाने 'सुंदर गायक' किंवा 'WILD BEAUTIFUL SINGER' ही उपाधी दिली. रानात आलेला सुंदर गायक म्हणजे साक्षात नरसिंह भगवान, ज्यांच्या गर्जनेतही भक्तांसाठी एक सुरेल सुरक्षा आणि मायेची साद होती. जसे पूर्वी ऋषींना जंगलात हिंस्त्र श्वापदांची भीती वाटायची, तशीच आजच्या धावपळीच्या जीवनात आपल्यालाही अनेक संकटांची आणि नकारात्मकतेची भीती वाटते, अशा वेळी हा 'सुंदर गायक' नरसिंह आपल्याला मानसिक शांती आणि ऊर्जा देतो.

हे स्थान आज 'काट्टू अझगिया सिंगर' या नावाने प्रसिद्ध आहे, ज्याचा अर्थ जंगलातील देखणा नरसिंह असा होतो. जुन्या जाणकारांच्या आणि आजोबांच्या तोंडून ऐकलेली एक गुपित आणि अत्यंत दुर्मिळ माहिती अशी की, येथील भगवान नरसिंहाची मूर्ती कुणीही मानवाने घडवलेली नसून ती साक्षात स्वयंभू आहे. या मूर्तीच्या डोळ्यांमध्ये एक विशेष चमक आहे, जी आजही भक्तांना आपल्याकडे आकर्षित करते. ही मूर्ती पश्चिमेकडे म्हणजेच थेट मुख्य श्रीरंगम रंगनाथस्वामी मंदिराकडे तोंड करून बसलेली आहे आणि विशेष म्हणजे त्यांच्या डाव्या मांडीवर साक्षात माता महालक्ष्मी विराजमान आहे. श्रीरंगम रंगनाथस्वामी मंदिराचे पूर्वेकडून रक्षण करणारे 'पालकदेव' म्हणून भगवान नरसिंहांचे हे स्थान मोठ्या श्रद्धेने पुजले जाते आणि म्हणूनच मुख्य मंदिरातील कोणत्याही मोठ्या उत्सवापूर्वी किंवा कार्यापूर्वी या नरसिंहाचा आशीर्वाद घेणे अनिवार्य मानले जाते. श्रीरंगम मंदिर निर्माण होण्यापूर्वीच नरसिंहांचे हे चैतन्य तिथे वास करत होते.

या दोन मंदिरांमधील सर्वात विलक्षण भौतिक आणि आध्यात्मिक संबंध म्हणजे विजयादशमीचा म्हणजेच दसऱ्याचा सोहळा; या दिवशी मुख्य मंदिरातील श्री नामपेरुमल म्हणजेच साक्षात भगवान रंगनाथ स्वतः घोड्यावर स्वार होऊन (कुथिराई वाहन) या काट्टू अझगिया सिंगर मंदिरात येतात आणि तिथेच शमी वृक्षाची पूजा व वेळ्ळई कुथिराई हा विधी पार पडतो. वर्षातून एकदा होणारा हा देवांमधील भेटीचा सोहळा पाहण्यासाठी आणि देवाची भेट अनुभवण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. याशिवाय, ऐतिहासिक दृष्ट्याही या ठिकाणाचे मोठे महत्त्व आहे, कारण अनेक शतकांपूर्वी महान श्रीवैष्णव आचार्य पिल्लई लोकाचार्य यांनी याच नरसिंह मंदिराच्या आडोशाला बसून आपले अनेक महत्त्वाचे धार्मिक उपदेश आणि प्रवचने दिली होती. पूर्वी हे ठिकाण अत्यंत भयानक आणि अंधारे होते, जिथे खूप जास्त भीती वाटायची, परंतु आता मात्र इथे भक्तीचा एक मोठा सागर उसळलेला दिसतो आणि स्वाती नक्षत्र व प्रदोष यांसारख्या पवित्र दिवशी इथे दिला जाणारा चक्कराई पोंगल, दध्योनम (दहीभात) यांचा गोड सुगंध संपूर्ण परिसरात दरवळत असतो, जो भाविकांमध्ये महाप्रसाद म्हणून वाटला जातो.

त्रिचीचा हा गौरवशाली वारसा, श्रीरंगमचे वैभव आणि नरसिंहांची ही गाथा म्हणजे भक्ती, शक्ती, प्राचीन परंपरा आणि संरक्षणाचा एक अनोखा संगम आहे, जो आजही आपल्याला सांगतो की जेथे खरी भक्ती असते, तेथे साक्षात परमात्मा अंधाराला चिरून प्रकाशाचे रूप घेऊन प्रकट होतो.

# महाभारत युद्ध समाप्त होने पर क्यो पसरी थी घोर उदासी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाभारत युद्ध समाप्त हो चुका था। युद्धभूमि में यत्र-तत्र योद्धाओं के फ़टे वस्त्र, मुकुट, टूटे शस्त्र, टूटे रथों के चक्के, छज्जे आदि बिखरे हुए थे, और वायुमण्डल में पसरी हुई थी घोर उदासी।

गिद्ध, कुत्ते, सियारों की उदास और डरावनी आवाजों के बीच उस निर्जन हो चुकी उस भूमि में द्वापर का सबसे महान योद्धा देवब्रत भीष्म शरशय्या पर पड़ा सूर्य के उत्तरायण होने की प्रतीक्षा कर रहा था। अकेला... तभी उनके कानों में एक परिचित ध्वनि शहद घोलती हुई पहुँची, "प्रणाम पितामह" भीष्म के सूख चुके अधरों पर एक मरी हुई मुस्कुराहट तैर उठी। बोले, " आओ देवकीनंदन... स्वागत है तुम्हारा! मैं बहुत देर से तुम्हारा ही स्मरण कर रहा था।"

कृष्ण बोले, " क्या कहूँ पितामह! अब तो यह भी नहीं पूछ सकता कि कैसे हैं आप।"

भीष्म चुप रहे। कुछ क्षण बाद बोले, " पुत्र युधिष्ठिर का राज्याभिषेक करा चुके केशव? उनका ध्यान रखना, परिवार के बुजुर्गों से रिक्त हो चुके राजप्रासाद में उन्हें अब सबसे अधिक तुम्हारी ही आवश्यकता है।" कृष्ण चुप रहे।

भीष्म ने पुनः कहा, " कुछ पूछूँ केशव? बड़े अच्छे समय से आये हो, सम्भवतः धरा छोड़ने के पूर्व मेरे अनेक भ्रम समाप्त हो जाँय।"

कृष्ण बोले- कहिये न पितामह!

एक बात बताओ प्रभु! तुम तो ईश्वर हो न..

कृष्ण ने बीच में ही टोका, "नहीं पितामह! मैं ईश्वर नहीं। मैं तो आपका पौत्र हूँ पितामह, ईश्वर नहीं।"

भीष्म उस घोर पीड़ा में भी ठठा के हँस पड़े। बोले, " अपने जीवन का स्वयं कभी आकलन नहीं कर पाया कृष्ण, सो नहीं जानता कि अच्छा रहा या बुरा। पर अब तो इस धरा से जा रहा हूँ कन्हैया, अब तो ठगना छोड़ दे रे..."

कृष्ण जाने क्यों भीष्म के पास सरक आये और उनका हाथ पकड़ कर बोले, " कहिये पितामह!"


भीष्म बोले, "एक बात बताओ कन्हैया! इस युद्ध में जो हुआ वो ठीक था क्या?"

"किसकी ओर से पितामह? पांडवों की ओर से?"

"कौरवों के कृत्यों पर चर्चा का तो अब कोई अर्थ ही नहीं कन्हैया, पर क्या पांडवों की ओर से जो हुआ वो सही था? आचार्य द्रोण का वध, दुर्योधन की जंघा के नीचे प्रहार, दुःशासन की छाती का चीरा जाना, जयद्रथ के साथ हुआ छल, निहत्थे कर्ण का वध, सब ठीक था क्या? यह सब उचित था क्या?"

- इसका उत्तर मैं कैसे दे सकता हूँ पितामह! इसका उत्तर तो उन्हें देना चाहिए जिन्होंने यह किया। उत्तर दें दुर्योधन का वध करने वाले भीम, उत्तर दें कर्ण और जयद्रथ का वध करने वाले अर्जुन, मैं तो इस युद्ध में कहीं था ही नहीं पितामह!

"अभी भी छलना नहीं छोड़ोगे कृष्ण? अरे विश्व भले कहता रहे कि महाभारत को



अर्जुन और भीम ने जीता है, पर मैं जानता हूँ कन्हैया कि यह तुम्हारी और केवल तुम्हारी विजय है। मैं तो उत्तर तुम्ही से पूछूंगा कृष्ण!"

-"तो सुनिए पितामह! कुछ बुरा नहीं हुआ, कुछ अनैतिक नहीं हुआ। वही हुआ जो हो होना चाहिए।"

- यह तुम कह रहे हो केशव? मर्यादा पुरुषोत्तम राम का अवतार कृष्ण कह रहा है? यह क्षल तो किसी युग में हमारे सनातन संस्कारों का अंग नहीं रहा, फिर यह उचित कैसे गया? "

-इतिहास से शिक्षा ली जाती है पितामह, पर निर्णय वर्तमान की परिस्थितियों के आधार पर लेना पड़ता है। हर युग अपने तर्कों और अपनी आवश्यकता के आधार पर अपना नायक चुनता है। राम त्रेता युग के नायक थे, मेरे भाग में द्वापर आया था। हम दोनों का निर्णय एक सा नहीं हो सकता पितामह।"

-नहीं समझ पाया कृष्ण! तनिक समझाओ तो..."

-राम और कृष्ण की परिस्थितियों में बहुत अंतर है पितामह! राम के युग में खल भी 'रावण' जैसा शिवभक्त होता था। तब रावण जैसी नकारात्मक शक्ति के परिवार में भी विभीषण और कुम्भकर्ण जैसे सन्त हुआ करते थे। तब बाली जैसे खलनायक के परिवार में भी तारा जैसी विदुषी स्त्रियाँ और अंगद जैसे सज्जन पुत्र होते थे। उस युग में खलनायक भी धर्म का ज्ञान रखता था। इसलिए राम ने उनके साथ कहीं छल नहीं किया। किंतु मेरे युग के भाग में में कंस, जरासन्ध, दुर्योधन, दुःशासन, शकुनी, जयद्रथ जैसे घोर पापी आये हैं। उनकी समाप्ति के लिए हर छल उचित है पितामह। पाप का अंत आवश्यक है पितामह, वह चाहे जिस विधि से हो।"

-तो क्या तुम्हारे इन निर्णयों से गलत परम्पराएं नहीं प्रारम्भ होंगी केशव? क्या भविष्य तुम्हारे इन छलों का अनुशरण नहीं करेगा? और यदि करेगा तो क्या यह उचित होगा?"

-भविष्य तो इससे भी अधिक नकारात्मक आ रहा है पितामह। कलियुग में तो इतने से भी काम नहीं चलेगा। वहाँ मनुष्य को कृष्ण से भी अधिक कठोर होना होगा, नहीं तो धर्म समाप्त हो जाएगा। जब क्रूर और अनैतिक शक्तियाँ धर्म का समूल नाश करने के लिए आक्रमण कर रही हों, तो नैतिकता अर्थहीन हो जाती है पितामह! तब महत्वपूर्ण होती है विजय, केवल विजय। भविष्य को यह सीखना ही होगा पितामह।"

-"क्या धर्म का भी नाश हो सकता है केशव? और यदि धर्म का नाश होना ही है, तो क्या मनुष्य इसे रोक सकता है?"

-"सबकुछ ईश्वर के भरोसे छोड़ कर बैठना मूर्खता होती है पितामह! ईश्वर स्वयं कुछ नहीं करता, सब मनुष्य को ही करना पड़ता है। आप मुझे भी ईश्वर कहते हैं न! तो बताइए न पितामह, मैंने स्वयं इस युद्ध में कुछ किया क्या? सब पांडवों को ही करना पड़ा न? यही प्रकृति का संविधान है। युद्ध के प्रथम दिन यही तो कहा था मैंने अर्जुन से। यही परम सत्य है।"

भीष्म अब सन्तुष्ट लग रहे थे। उनकी आँखें धीरे-धीरे बन्द होने लगीं थी। उन्होंने कहा- चलो कृष्ण! यह इस धरा पर अंतिम रात्रि है, कल सम्भवतः चले जाना हो... अपने इस अभागे भक्त पर कृपा करना कृष्ण!"

कृष्ण ने मन मे ही कुछ कहा और भीष्म को प्रणाम कर लौट चले, पर युद्धभूमि के उस डरावने अंधकार में भविष्य को जीवन का सबसे बड़ा सूत्र मिल चुका था।

जब अनैतिक और क्रूर शक्तियाँ धर्म का विनाश करने के लिए आक्रमण कर रही हों, तो नैतिकता का पाठ आत्मघाती होता है।

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)